पेडणे तालुक्यातील समस्यावर आवाज उठवणार

■ टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. ११ : पेडणे तालुक्यात होणाऱ्या उद्भवणाऱ्या विविध समस्या, रस्ते पाणी वीज, जमीन याबाबत या चळवळीतर्फे आवाज उठवण्यात येणार आहे. लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी आणि त्याबाबत आवाज करण्यासाठी त्या पूर्ण करण्यासाठी ही संघटना काम करणार आहे. पेडणे तालुक्यात तुये येथे हे इस्पितळ आहे. या ठिकाणी सामुदायिक आरोग्य केंद्र आहे. मात्र त्या ठिकाणी उपचार देण्यासाठी साधन सुविधा तसेच डॉक्टरांचा अभाव असल्याने रुग्णांना मापसा किंवा बांबोडे येथे गोवा वैद्यकीय महाविद्यालयात जावे लागते आणि वाटेत जातानाच काही रुग्ण दगावतात. त्यामुळे या ठिकाणी माजी मुख्यमंत्री लक्ष्मीकांत पार्सेकर यांनी दूरदृष्टी ठेवून शंभर खाटांचा इस्पितळ प्रकल्प आणला.

मात्र त्यानंतर आलेले आमदार यांनी हा प्रकल्पचा पाठपुरावा करण्यास अपयशी ठरलेले आहे. हा प्रकल्प गोवा साधन सुविधा विकास महामंडळ यांच्या वतीने हाती घेण्यात आलेला आहे. आज या ठिकाणी या प्रकल्पाची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी आज आम्ही त्या कार्यालयावर धडक दिली. आणि त्याबाबत त्यांनाही प्रश्न केले आज आमचा पायगुण आहे. की गेली अनेक दिवस रेंगाळत असलेली अग्निशामक दलाची एनओसी आजच त्यांना ती अग्निशामक दलाने दिल्याची माहिती तेथील व्यवस्था सांगोडकर यांनी आम्हाला दिली आहे. आता अन्य जी पंचायत आणि अन्य कार्यालयाचे दाखले याचे सोपस्कार ते पूर्ण करणार असल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्याने दिली त्यानंतर हा प्रकल्प आम्हाला त्या ठिकाणी शंभर खाटांचा सुरू करण्याची मागणी आम्ही केलेली आहे. सर्व सुविधा युक्त असा हा प्रकल्प त्या ठिकाणी सरकारने पेडणे वासियांना देण्याची गरज आहे. जर हा प्रकल्प त्या ठिकाणी झाला नाही आणि सामुदायिक आरोग्य तिथे स्थलांतर केले. तर त्याला कडाडून विरोध केला जाणार असल्याचा इशारा यावेळी प्रशांत उर्फ बाळा नाईक यांनी दिला.

पेडणे : पत्रकारांकडे बोलताना माजी सरपंच ॲड. अमित सावंत. सोबत माजी सरपंच प्रशांत नाईक व इतर.

CHANGE IN NAME

I **CHITTIBABU GHANTA** R/o, Hno - ETH-2, Adwalpalkar Shelter Taleigao Tiswadi Goa would like to change my name from **CHITTIBABU GANTA** TO **CHITTIBABU GHANTA.** Hereafter in all documents and dealing will be known by the name **CHITTIBABU GHANTA.**

सामाजिक संस्थांनी स्वच्छता मोहीम राबवावी

▶ मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत

■ टीम दैनिक हेराल्ड

डिचोली, दि. ११ : रोटरी सारखी संस्था पायाभूत सुविधा बरोबरच संस्कृती सेवा शिक्षण आरोग्य क्षेत्रात उत्तम काम करत आहे. मात्र त्यांनी सामाजिक बांधिलकी जपण्याबरोबरच राज्यातील स्वच्छता जागृती प्लास्टिक मुक्त परिसर व नियमित नितळ सुंदर शहर यासाठी विशेष मोहीम राबवत आपले योगदान द्यावे. सरकार आपल्या परीने सर्व काही गरज आहे. मात्र समाज जागृती करणे गरजेचे असून त्या दृष्टीने त्यांनी योगदान दिल्यास खऱ्या अर्थानं ते सामाजिक सेवाकार्य ठरेले, असे प्रतिपादन मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी साखळी येथे केले.

डिचोली रोटरी क्लबतर्फे ब्लू ग्लोब एक्स्पोर्ट प्रायव्हेट लिमिटेड यांनी सामाजिक सेवा उपक्रमांतर्गत उभारलेल्या बस स्टॉप शेल्टरच्या उद्घाटन प्रसंगी मुख्यमंत्री बोलत होते. व्यासपीठावर नगराध्यक्ष सिद्धी प्रभू, रोटरीचे जिल्हा प्रांतपाल शरद पै, अध्यक्ष स्वप्निल दीक्षित, अंजली दीक्षित, सिद्धेश कुबल प्रतीक्षा खलप, निकिता नाईक, सागर शेट्ये, दामोदर प्रभू, उपनगराध्यक्ष आनंद काणेकर, दयानंद बोर्येकर, यशवंत माडकर, नरहरी सावंत, डॉ. ज्योती सावंत क्लबचे पदाधिकारी उपस्थित होते. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेसाठी बस शेल्टर अतिशय महत्त्वाचे असून त्या प्रवाशांना बस सेंटरचे महत्त्व समजत असते. ऊन पावसात खूप गरज असते. प्रवाशांसाठी निवारा शेड उत्तम सेवा उपक्रम आहे, त्याचबरोबर प्लास्टिक मुक्तीसाठी प्रदूषण मुक्तीसाठी सामाजिक संस्थांनी योगदान दिल्यास ते सरकारसाठी जनतेसाठी अधिक उपयुक्त ठरेल.

सरकार आपल्या परीने अनेक वेगवेगळ्या उपक्रम सातत्याने राबवत आहे. मात्र लोकांना जागृती करून प्रत्यक्ष अंमलबजावणी होणे गरजेचे असून त्या कार्यात रोटरी सारख्या संस्थांनी मदतीचा हात देण्याचे आवाहन यावेळी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी केले.

स्वप्निल दीक्षित यांनी मुख्यमंत्र्यांचे स्वागत केले. यावेळी प्रांतपाल पै यांनी रोटरी क्लब वेगवेगळ्या क्षेत्रात अनेक उपक्रम राबवत असून त्याला जनतेची व सरकारची साथ लाभत असल्याने लोकांना अनेक उपक्रमात सहकार्य मिळते, असे स्पस्ट केले. सूत्रसंचालन रामानंद नाटेकरचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

साखळी : बसस्टॉप शेल्टरचे उद्घाटन करताना मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, शरद पै नगराध्यक्ष सिद्धी प्रभू, स्वप्नील दीक्षित, अंजली दीक्षित सागर शेट्ये व इतर.

पर्यावरण सप्ताहनिमित्त साखळीतील हेडगेवार विद्यामंदिरात विविध उपक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

साखळी, दि. ११ :कारापूर तिस्क येथील डॉ. के.ब. हेडगेवार विद्यामंदिरात मंगळवारी पर्यावरण सप्ताहानिमित्त 'वृक्षदिंडी' काढण्यात आली. उत्साहपूर्ण वातावरणात निघालेल्या या दिंडीत एका वनस्पतीच्या रोपाची पालखी सजवून नेण्यात आली होती. ही पालखी रानफुले व वेलींनी आकर्षकरीत्या सजवण्यात आली होती.

विद्यार्थ्यांनी कापडी फलकांवर पर्यावरण जनजागृतीपर घोषवाक्ये लिहून दिंडीत सहभाग घेतला. त्यांनी प्लास्टिक वापर थांबवा असा संदेश दिला. याच उपक्रमाचा भाग म्हणून सुमारे १५० विद्यार्थ्यांनी कापडी पिशव्या तयार करून घराघरात वाटप केले आणि प्लास्टिकच्या पर्यायाची निवड करण्याचे आवाहन केले.

विद्यालयात प्लास्टिक कचरा कमी करण्यावर आधारित चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्रासाठी पर्यावरण कार्यकर्त्या सौ. आसावरी कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी स्वतः लिहिलेल्या पर्यावरण वाचवा या विषयावर आधारित कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली. शिक्षिका श्रेया बर्वे हिने पर्यावरण दिनाचे महत्त्व सांगितले.

मुख्याध्यापक सदानंद मिशाळ यांनी सांगितले की, या शैक्षणिक वर्षात सिंगल यूज प्लास्टिकचा वापर कमी करण्यावर भर देण्यात येणार असून, त्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येतील. संपूर्ण सप्ताह शिक्षक, विद्यार्थी, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि ठढज अधिकाऱ्यांच्या सक्रिय सहभागामुळे अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.

साखळी : पर्यावरण सप्ताहानिमित्त उपक्रमात सहभागी झालेले हेडगेवार विद्यामंदिराचे विद्यार्थी.

ग्रंथपालांनी हॅपिनेस कार्यक्रमांमध्ये सहभागी व्हावे

सुलक्षणा सावंत रवींद्र भवन साखळीत निवृत्त ग्रंथपालांचा सत्कार

■ टीम दैनिक हेराल्ड

सांखळी दि. ११ : आपण वाचनालय जिवंत ठेवण्याचे काम केले पाहिजे.सतत ज्ञान मिळवित राहिले पाहिजे.ज्ञान मिळविण्यासाठी आपले आयुष्यही कमी पडू शकते.ग्रंथपालाने सतत नवनवीन गोष्टी शिकत राहिल्या पाहिजेत. आज बऱ्याच जणांची वाचनाची सवय खूप कमी झाली आहे.ग्रंथपालांनी हॅपिनेस कार्यक्रमांमध्ये सहभागी व्हायला हवे.आपल्या आनंदाचा रिमोट आपल्या हातात ठेवायला हवा.वाचनालय हे माझ्यासाठी मंदिर आहे असे उदगार सौ.सुलक्षणा सावंत यांनी काढले.

रवींद्र भवन सांखळीच्या परिषद सभागृहात उच्च माध्यमिक ग्रंथपाल संघटना गोवा आयोजित निवृत्त ग्रंथपालांच्या सत्कारानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या.त्या पुढे म्हणाल्या. एआय तंत्रज्ञानाचा वापर ग्रंथालयातून व्हायला पाहिजे.ग्रंथपालनातील वाढत्या आव्हानांना तोंड देण्यासाठी एआय साधने आणि तंत्रज्ञानाचा अवलंब केला पाहिजे.नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून सेवा सुधारण्याचा प्रयत्न व्हायला पाहिजे.मोबाईल वापराच्या अतिरेकामुळे होणारा संघर्ष सामंजस्याने हाताळावा.राष्टीय शिक्षण धोरण (एनईपी) आता विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचे विषय निवडण्याची परवानगी देते, ज्यामुळे त्यांना भविष्यातील विविध करिअरसाठी कौशल्ये प्राप्त होतात.

याप्रसंगी व्यासपीठावर गोवा उच्च माध्यमिक ग्रंथपाल संघटनेचे अध्यक्ष संजीव आजगावकर,संस्थेचे प्रवक्ते तथा सत्कारमूर्ती सदानंद ईश्वर नाईक,सत्कारमूर्ती निवृत्त ग्रंथपाल महादेव देसाई,केरोशियन रॉड्रीगस,सौ.विद्या जोशी,सौ.वनिता दामोदर पंचवाडकर,सौ.राजेश्री गायकवाड,सौ.प्रज्योती गावस देसाई इत्यादी मान्यवर उपस्थित होते.सौ.सुलक्षणा सावंत यांच्याहस्ते शाल,श्रीफळ,स्मृतिचिन्ह व फुले देऊन सत्कार करण्यात आला.

सौ कनका स्वामी,मंगेश नाईक,आत्मा ठाकूर,सौ पल्लवी मराठे,सौ.अनुपा रायकर,नसीमा खान,निर्मला गोन्साल्विस यांनी सत्कारमूर्तींचा परिचय केला.

सुनील मेथर,एस. व्ही. तारी,संभाजी गायकवाड,शैला पोरोबो,प्रकाश गवंडळकर,कनका स्वामी यांनाही गौरविण्यात आले.

यावेळी सदानंद नाईक यांनी आपल्या कार्यकाळातील अनेक अनुभव सांगितले.निवृत्त सदस्यांचा सन्मान करण्याची परंपरा कायम ठेवल्याबद्दल त्यांनी आयोजन समितीचे आभार मानले. त्यांनी सदस्यांना संघटनेशी जोडलेले राहण्यास आणि ग्रंथालय शास्त्रातील सध्याच्या ट्रेंड्सवर कार्यशाळा आयोजित करून त्यांचे ज्ञान अद्ययावत ठेवण्याची विनंती केली. येणाऱ्या काळातही सत्काराची परंपरा सुरू ठेवा असे आवाहन केले.

विविधा उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर केले तर आर्यवर्धन नाईक यांनी बासरी वादन केले.

संस्थेचे अध्यक्ष संजीव आजगावकर यांनी स्वागत केले.सौ.सायली प्रभू यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नसीमा खान यांनी केले तर पल्लवी मराठे यांनी आभार मानले,

साखळी : उच्च माध्यमिक ग्रंथपाल संघटनेतर्फे सत्कार करण्यात आलेल्या ग्रंथपालांसोबत सुलक्षणा सावंत, संजीव आजगावकर व इतर.

पान १ वरून

गोवा वारसा धोरण २०२५ ला अधिकृत मंजुरी

तसेच ४६ लोककला प्रकारांना व ६१ पारंपरिक व्यवसायांना मान्यता देण्यात आली आहे. राज्य मंत्रिमंडळाने येत्या २२ जुलैपासून विधानसभेचे पावसाळी अधिवेशन बोलावण्यासही मान्यता दिली आहे. अधिवेशनाचा कालावधी लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. यावर्षी मार्चमध्ये झालेल्या शेवटच्या अधिवेशनात मुख्यमंत्री सावंत यांनी २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठीचा अर्थसंकल्प सादर केला होता. पारंपरिक टॅक्सी चालकांच्या नाराजीचा उल्लेख करत मुख्यमंत्री म्हणाले की, ट्रान्सपोर्ट ॲग्रीगेटर्स संदर्भातील सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वांविरोधात टॅक्सी चालकांनी नाराजी व्यक्त केली आहे. मात्र, सर्व संबंधित भागधारकांशी चर्चा करून हा प्रश्न लवकरच सुटवण्यात येईल . सरकार कोणाचेही नुकसान करणारे धोरण राबवणार नाही . नव्या धोरणात पारंपरिक टॅक्सी चालक आणि ट्रान्सपोर्ट ॲग्रीगेटर्स या दोन्ही घटकांचा विचार केला जाईल.

ढवळीतील भंगारअड्ड्यांमुळे आगीच्या संकटाची चाहूल

सरपंच मनुजा नाईक यांनी मान्य केले की, सध्या गावात असलेली सर्व भंगार कामे बेकायदेशीर आहेत आणि पंचायतकडून लवकरच कारवाई केली जाईल. भंगार कामांची तपासणी पूर्ण झाल्याचे त्यांनी सांगितले असून, त्याचा अहवाल उच्च न्यायालयात सादर करण्यात येणार आहे. तथापि, काही जमीनमालक या भंगार कामांना पाठिंबा देत असल्यामुळे जेव्हा पंचायत कारवाई करते, तेव्हा न्यायालयीन स्थगिती घेतली जाते, असेही त्या म्हणाल्या. त्यामुळे प्रशासनाला अंमलबजावणीत अडचणींचा सामना करावा लागत असल्याची त्यांनी स्पष्टोक्ती केली. स्थानिकांचे म्हणणे आहे की, भंगार कामे समाजविरोधी घटकांचे अड्डे बनली आहेत. या ठिकाणी कोणत्याही तपासणीशिवाय भाडेकरूंना राहू दिले जाते, त्यामुळे पोलिस पडताळणी अनिवार्य करावी, अशी मागणी केली आहे. एका भंगारकामगृहात बेलिंग मशीन असून, ही उपकरणे आग लागण्याची शक्यता वाढवतात.

कोविडचा सौम्य पुनरुदय : आरोग्य विभाग सतर्क

या गटातील कोणतीही लक्षणे दिसल्यास त्वरित चाचणी केली जाते. सध्या तरी हा कोणताही नवीन किंवा घातक प्रकार नाही. २०२३ मध्ये आपण पाहिलेला जो प्रकार होता, तोच आहे. त्यामुळे रुग्णालयात दाखल होण्याचे प्रमाण अत्यल्प आहे,असे बेतोडकर यांनी सांगितले.डॉ. बेतोडकर यांनी जनतेला आवाहन केले की, सर्वसामान्य फ्लूसाठी घ्याव्या लागणाऱ्या खबरदारीप्रमाणेच कोविडसाठीही खबरदारी घ्यावी. शिंकताना किंवा खोकताना टिश्यू किंवा रुमाल वापरणे, ताप किंवा फ्लूची लक्षणे असताना गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळणे, आणि शक्य असल्यास जवळच्या डॉक्टरांचा सल्ला घेणे हे उपाय महत्त्वाचे आहेत.

गोव्यातील खारफुटींना वाढता धोका; सरकारचा नवा आराखडा

योजनेत स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, वनक्षेत्राबाहेरील खारफुटी संवर्धनासाठी स्वतंत्र कायदा लागू करणे आवश्यक आहे. उल्लंघन करणाऱ्यांना कठोर दंडाची तरतूद आणि मजबूत संस्थात्मक रचना सुचवण्यात आली आहे.चोराव्च्या सलीम अली पक्षी अभयारण्याच्या धर्तीवर नवीन सागरी संरक्षित क्षेत्र तयार करण्याची शिफारस करण्यात आली आहे. यामध्ये पर्यावरणाचे रक्षण करत नियंत्रित पर्यटनाला प्रोत्साहन दिले जाईल. पर्यटकांसाठी पक्षीनिरीक्षण डेक्स, निसर्गमार्ग आणि छोटी बोट सफर आदी अनाहस्तक्षेप मार्गांची योजना आखण्यात आली आहे. गोव्याच्या किनारी परिसंस्थांचे रक्षण आणि संवर्धन करण्यासाठी तयार झालेली ही योजना केवळ पर्यावरणपूरक नव्हे, तर सामाजिक सहभागाने प्रेरित आहे. येत्या काळात ही योजना अंमलात आणणे आणि खारफुटीच्या टिकावासाठी सर्व विभाग आणि समाजाच्या संयुक्त प्रयत्नांची गरज आहे.

साळ येथे वटपौर्णिमा उत्साहात साजरी

साळ : येथील बाबरेश्वर देवस्थान क्षेत्रात वट वृक्षाची पुजा केल्यानंतर वटवृक्षाला हातात सुती धागा घेऊन सात फेऱ्या मारताना सुहासिनी.

■ टीम दैनिक हेराल्ड

साळ, दि. ११ : साळ येथील सुहासिनींकडून वटपौर्णिमा उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. साळ येथील वाड्या - वाड्यावरील घरा-घरामधून सुहासिनी तसे नववधू सुद्धा व्रत केलेल्या सुवासिनी पौर्णिमेच्यादिनी सकाळी १० नंतर अंदाजे एक किलोमीटर अंतरावर असलेल्या शेत क्षेत्रातील बाबरेश्वर क्षेत्रात असलेल्या वट वृक्षाची त्यांनी यथासांग पूजा केली नंतर सुत गुंडाळून सात फेऱ्या वटवृक्षाला घातल्या व आपल्या सौभाग्याच्या भावी आयुष्यासाठी व सुखासाठी आशीर्वाद मागितला.

पतिव्रता सत्यवान - सावित्री पौराणिक कथेप्रमाणे आज प्रत्येक सुवासिनी या वटवृक्षाचे आभार मानून त्याची पूजा अर्चा करतात असे सांगितले जाते आणि आज तोच आपला सुहासिनीचा एक व्रतवैकल्प प्रत्येक हिंदूंमध्ये रुजवून साजरा केला जातो तो दिवस होता ज्येष्ठ शुद्ध पौर्णिमा आणि या दिवशी प्रत्येक वर्षी वटपौर्णिमा उत्सव सुहासिनी साजरा करतात.

अगोदर आम्ही वडाच्या डहाळ्या तोडून घरी नेऊन त्याची पूजा करायचो पण आता मी तसं करत नाही प्रत्येकाने एकेक डहाळी तोडली तर वृक्षाचे मोठे नुकसान होते म्हणजे निसर्गाचे नुकसान होते ते आम्हाला पटले आणि वटवृक्ष जास्त प्रमाणात ऑक्सिजन निर्मिती करतो एकंदरीत पर्यावरणाचे आम्हीच नुकसान करतो हे आम्हाला पटले आणि ती चूक आम्ही परत करत नाही. पण आता आम्ही वटवृक्षाखाली येऊन त्याची पूजा करतो, असे विंदा परब, मिता चिनरकर यांनी सांगितले.

वटपौर्णिमेचे व्रत करणारी प्रत्येक स्त्री शेत जमिन क्षेत्रात असलेल्या बाबरेश्वर देवस्थान ठिकाणच्या वडाच्या झाडा खाली येऊन त्याची यथा सांग पूजा करीत आहेत तसेच या वटवृक्षाला दोराने सात वेळा फेऱ्या मारून दोर गुंडाळून त्या वडदेवाकडे आपले मागणे ठेवतात नंतर वट पानाचा द्रोण करून पंचफळाचे तुकडे घालून अनशीच्या दोरात पाच काळे पिडडूके (मणी) ओवून गाठ बांधून एकमेकांना वाटतात ज्याला आम्ही वाण म्हणतो असे विंदा विजय परब हिने सांगितले, त्यांच्या संगे दिक्षा परब, उत्कर्षा राऊत, मिता चिनरकर, शिल्पा मांद्रेकर, प्रियांका अमोल राऊत तसेच अनेक सुहासिनी महिला सहभागी झाल्या होत्या. उपस्थित महिलांनी वाण एकमेकींना वाटले व चरणस्पर्श करून नमस्कार केला अशा तऱ्हेने या वटपौर्णिमेचा उत्साहात साळ येथे साजरा करण्यात आला.

IN THE OFFICE OF THE INSPECTOR OF SURVEY & LAND RECORDS, PONDA-GOA

Case No. ISLR/DEM/PON/CAND/33/2024

Directorate of Education R/o Alto - Porvorim Bardez Goa ...Applicant

V/S

1. Ramakant Keshav Sinai Candepar, R/o. Bazar Khandepar Ponda - Goa Pin code 403406 2. Prabhacar Soguna Naik R/o. H.No.149/5 Gauthan Khandepar, Ponda Goa 3. Laxmana Soguna Naik R/o. H.No.149/1 Gauthan Khandepar, Ponda Goa 4. Datta Soguna Naik R/o. H.No.149/2 Gauthan Khandepar, Ponda Goa 5. Sogun Usno Naik R/o Gauthan Khandepar, Ponda Goa 6. Shivdas Atmaram Shet Verenkar R/o H.No.146, Gauthan Khandepar, Ponda Goa 7. Ramakant Keshav Sinai Candeparkar, Bazar Khandepar, Ponda-Goa 8.Shaba Apa Naik R/o. H.No.151 Gauthan Khandepar, Ponda Goa Damodar Shaba Naik R/o.Gauthan Khandepar Ponda Goa 9.Narshirv Vithu Naik R/o. H.No.154 Gauthan Khandepar Ponda Goa. 10.Kashinath Bhikaji Naik R/o H.No. 156/a Gauthan Khandepar Ponda Goa 11.Narayan Yeshwant Naik R/o H.No.156 Gauthan Khandepar Ponda Goa 12.Vijaya Krishna Naik R/o H.No.152 Gauthan Khandepar Ponda Goa 13.Gopal Chandra Mahadev Sinai Khandeparkar R/o Tariwada, Bazar Khandepar, Ponda Goa Pin code 403406 A 14.Subhash Krishna Naik R/o R/o H.No.157 Gauthan Khandepar Ponda Goa ...Respondents

PUBLIC NOTICE

Whereas, the above named applicant has moved an application to this Court for Demarcation under section 114 of Land Revenue Code 1968 for demarcating acquired boundary points of the property surveyed under Survey No. 2/3 of **Candepar village of Ponda-Goa.**

AND WHEREAS, applicant served the notices through Registered A.D to the adjoining holders.

AND WHEREAS, notices are returned back from the postal authority with the endorsement "Not Found, unclaimed Not known", etc.

AND WHEREAS, the applicant has made an application on 28/05/2025 and prayed for service of summons by issuing Public Notice in any local daily under order V Rule (20(1-A) of Civil Procedure Code, 1908 as the applicant has stated his inability to submit the detailed addresses of the above respondents and their legal heirs.

AND WHEREAS, I am satisfied that this is a fit case for grant of such publication.

NOW THEREFORE, notice is hereby given to the applicant who thereby shall remain present in the office of Inspector of Survey and Land Records, Ponda Goa at **2:30 P.M.** on **04/07/2025** in order to proceed to the site along with the Field Surveyors Shri. Chetan Shirvaikar and Shushma Naik The respondents/adjoining land holders are requested to remain present at site on scheduled date i.e. **04/07/2025 at 3:00 P.M.** onwards.

The applicant is further requested to clear the bushes on the boundary line, if it has not been done so far, and arrange two labourers at site for helping the Surveyor for measurement work at the time of survey.

After completion of survey work your say will be recorded in the inspection report.

You are further directed to remain present before this Court on 25/07/2025 @ 10.30 a.m. and give your say in the matter if any, failing which the case will be heard and decided in your absence.

Given under my hand seal of this Court on this 06th day of June, 2025.

Sd/- **(Rajesh R. Pai Kuchelkar)**
Inspector of Survey & Land Records, Ponda Goa
SEAL

NOTICE

My Husband **Late Caetano Sacramento Jose Vaz** was owning **Maruti Vitara Brezza ZDI+ Car** bearing **Reg. No. GA-06-E-5660.** After his death, I have applied to transfer the ownership into my name. Any member of the public, or any other Institution/ Bank objecting for such transfer, may send their objections along with documentary proof, to the **RTO, Vasco** or to me **within 15 days** time from today.

Date: 11.06.2025 Sd/- **Mrs. Catarina Vaz**
H. No. 666, Near Vidhya Mandir School, Adarsh Nagar, Vasco-Da-Gama, South Goa 403802.

Sandeep Ads

BEFORE THE JOINT MAMLATDAR-III OF BARDEZ TALUKA MAPUSA, BARDEZ-GOA.

Mutation No: 214499. City: Mapusa.

1. Felicia De Souza, r/o H.no. 366/1 Crystal Ville, St Anns Colony Tivim, Bardez Goa ...Applicant

V/s

1. Giselle Joan Braganza 2. Maria Ubaldina de Braganza e Souza alias Maria U.B.e Souza alias Mary Ubaldin Dsouza 3. Luis Francis Gregorio Dsouza alias Luis Francis DSouza alias Francis G Dsouza 4. John Paul de Souza 5. John Paul de Souza 6. Joseph Bernard Braganza alias Joseph Braganza 7. Crystal Fay de Souza 8. Maria Joan DSouza 9. Rahul Cedric Dsouza 10.Lester Roy de Souza 11. Alvaro Jose DSouza alias Alvaro DSouza 12.Cedric Benedict DSouza ...Opponents

PUBLIC NOTICE

To all opponents /legal heirs/any other interested parties

Whereas the applicant Felicia De Souza r/o H.no. 366/1 Crystal Ville St Anns Colony Tivim Bardez Goa, has filed the application U/S 96 of Goa Land Revenue Code 1968 for Mutation in property bearing chalta no. 40 P.T. Sheet no 108 situated at Mapusa City Taluka Bardez Goa. Applicant has acquired the right over the property by virtue of order in inventory proceedings no 667/2022/D 16/03/2024 Passed in the court of Civil Judge Senior Division at Mapusa. Therefore applicant requested to include her name along with the name of Angelica Maria Goretti Braganza alias Angelica Braganza in form D of above mentioned chalta no. and P.T. Sheet no., by deleting existing name of Maria U.B.E Souza.

And whereas the notices in Form no. X were served to all the interested parties by registered A/ D. However some A. D. card returned back with the Postal remarks "Party Expired/Party Left/Not Known/Address out of Station" and he do not known the detailed addresses of the Legal heirs and whereabouts of the interested parties.

And whereas the applicant has prayed vide his application for substitute service, by publication of public notice in any one daily newspaper as required under Order V Rule 20(1A) of C.P.C. as the applicants does not know the legal heirs and the address of the interested parties.

All the interested parties are hereby given notice of the said mutation entry and called upon to submit to me their objection if any to the mutation entry within 15 days from the date of publication of this notice failing which the suitable order under the provision of LRC shall be issued by the Certifying Officer.

Place: Mapusa. Date: 09/06/2025.
Sd/- (Jenisa Pereira)
Joint Mamlatdar-III Bardez, Mapusa Goa SEAL

गोवा सरकार
जलस्रोत खाते
काम विभाग-२, रावणफोंड, सासष्टी-गोवा
ई-निविदा सूचना

क्र. डब्ल्यूआरडी/डब्ल्यूडी-२/टेक/एफ-१७/१०(इ)/२०२५-२६
दि. १०/०६/२०२५

या कार्यालयाने वरील ई-निविदा प्रसिद्ध केली आहे. तपशील (संकेतस्थळ : **https://eprocure.goa.gov.in**) वर उपलब्ध आहे. निविदा प्रपत्रे देण्यासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची व ती ऑनलाईन सादर करण्याची **अंतिम तारीख २१/०६/२०२५ संध्या. ५.०० पर्यंत** आहे. तसेच तपशीलावर निविदा सूचना या कार्यालयाच्या सूचना फलकावर पाहता येईल. अधिक माहितीसाठी या विभागाच्या एएसडब्ल्यू कक्षाला संपर्क करावा.

डीआय/एडीव्हीटी/६२१/२०२५

Village Panchayat Penha de Franca, Britona Bardez Goa

Ref. No. VP/PDF/006/2025-26/701 **Notice Inviting Quotation** Dated : 10.06.2025

The Sarpanch of Village Panchayat Penha de Franca on behalf of Village Panchayat hereby invite quotations from the eligible Dealers/Agency/Agents/Contractor for the below mentioned works/items:

1. Purchase of Dust Bins to V.P. Penha de Franca.
2. Purchase and Installation of CCTV in V.P. Jurisdiction.
3. Purchase and Installation of Water Purifier filter to V.P. Penha de Franca.
4. Purchase of Electric Bike for V.P. Penha de Franca.
5. Purchase of Office Table to V.P. Penha de Franca.
6. Purchase of Computers and Laptop to V.P. Penha de Franca.
7. Purchase of Office Chairs for V.P. Penha de Franca.
8. Purchase of Office Cupboard to V.P. Penha de Franca.
9. Purchase of Electrical Material to V.P. Penha de Franca.

The Sealed quotations should be reached in the office of V.P. Penha de Franca on **30/06/2025 by 11.00 a.m.** and the same will be opened at **11.30 a.m.** onwards on the same day. The lowest quotation will be considered after approval from the competent authority. The right to accept or reject any or all the quotations received is reserved by the office of the Village Panchayat Penha de Franca without assigning any reasons for it. The Payment will be made after completion/delivery of goods if same is satisfactory and via egramswaraj. The amount should be quoted per item wherever applicable and for more details the information can be obtained from office of Village Panchayat of Penha de Franca, Britona.

Seal Sd/- (Sapnil R. Chodankar) Sarpanch, V.P. Penha de Franca